109

**रास्तभाव दुकानाच्या प्राधिकारपत्राचे नूतनीकरणाबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१८०१/२६९१२/प्र.क्र.७२३/नापु २८**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २ फेब्रुवारी, २००२**

**: शासन निर्णय :**

महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) आदेश १९७५ च्या सोबतच्या नमुना नं.७ मध्ये विहित केलेल्या प्रपत्रात रास्त भाव दुकानदारांना प्राधिकारपत्र देण्यात येते. उक्त आदेशामध्ये या प्राधिकारपत्राचे नूतनीकरण करुन घेण्याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या प्रधिकारपत्राचे नूतनीकरण काही वेळेस विहित कालमर्यादेत केले जात नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने विहित कालावधीत नूतनीकरण न होणा-या प्राधिकारपत्राबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) ज्या ठिकाणी संबंधित प्राधिकारपत्रधारकाने विहित कालमर्यादेत म्हणजेच त्यांच्या प्राधिकारपत्राची प्रकरणपरत्वे एक किंवा तीन वर्षांची मुदत संपण्यापूर्वी पुढील नूतनीकरण करण्यासाठी नूतनीकरण शुल्क भरले असेल अशा प्राधिकारपत्राचे नूतनीकरण तात्काळ करण्यात यावे व त्यासाठी कोणतेही दंडात्मक शुल्क आकारण्यांत येऊ नये.

२) ज्या ठिकाणी प्राधिकारपत्रधारकाने प्राधिकारपत्राचे नूतनीकरण विहित मुदतीत करुन घेतलेले नसेल तसेच नूतनीकरणाची फी सुध्दा विहित मुदतीत भरलेली नसेल अशा प्रकरणी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) आदेश १९७५ च्या सोबतच्या नमुना नं. ७ मध्ये विहित केलेल्या प्रपत्रातील परिच्छेद ५ खालील परंतुकानुसार प्राधिकारपत्रधारकाविरुध्द दंडात्मक कारवाई करुन प्राधिकारपत्राचे नूतनीकरण करण्यात यावे. कामकाजाच्या सोयींच्या दृष्टिने अशा प्राधिकारपत्रधारकांची संपूर्ण अनामत रक्कम जप्त करुन नूतनीकरणास उशीर झालेल्या प्रत्येक दिवसासाठी १ रुपया या प्रमाणे दंड आकारुन त्यांच्या प्राधिकारपत्राचे नूतनीकरण करुन देण्यांत यावे.

सर्व, प्राधिकारपत्र देण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांनी यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सही)

( सी. के. जाधव )
उप सचिव,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

जिल्हाधिकारी पुणे
कार्यासन संकलन
12 FEB 2002
प्रमुख लिपीक नायब अधिकारी

जिल्हा पुरवठा कार्यालय, पुणे.
13 FEB 2002

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव

Foodgrain Distribution Officer
PUNE
15 FEB 2002
A.K. A.F.D.O. F.D.O.